**ज्योतिषविषयक**

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, ९ इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



**DIRECT ADMISSION**

MBBS | MD | MS | BDS | MDS

BAMS | BUMS | BHMS

PANCHAKARMA

DERMATOLOGY | NURSING

PHARMACY

PHYSIOTHERAPY

PARAMEDICAL | VETERINARY

OPHTHALMOLOGY | FMGE

Indo Abroad Education

9326134770



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १५९ वा | शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ | पाने: ८ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



# "हे यश तुमचं आहे."

# 1003+ कोटी

ठेवी 558 | कर्ज 445




हा प्रवास आकड्यांचा नाही,
हा हजारो कुटुंबांचा, महिला, शेतकरी, युवक,
व्यापारी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या
विश्वासाचा प्रवास आहे.
आपण विश्वास ठेवला... आणि आम्ही तो जपला!
आदर्श एक विश्वास...!

आमचे प्रेरणास्थान



श्री. सुरेश पाटील, संस्थापक

आदर्श पतसंस्था अलिबाग

आमच्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्व सभासद, ठेवीदार, ग्राहक व हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार.

श्री. अभिजित पाटील, अध्यक्ष | श्री. कैलास जगे, उपाध्यक्ष | सौ. मीनाक्षी पाटील, सी.ई.ओ. | संचालक मंडळ व सर्व कर्मचारी वृंद

ग्राहक सेवा क्रमांक : 9112305888/9112306888

adarshapatsanstha | www.adarshapatsanstha.com

स्कॅन करा आणि आदर्श परिवारामध्ये सहभागी व्हा.

## संपादकीय

# काय गृहमंत्री लाभलाय महाराष्ट्राला?

## कायद्याचा बडगा, न्यायाचा गळा दाबणारी सत्ता

महाराष्ट्रात कायदा–सुव्यवस्थेची स्थिती नेमकी कोणत्या दिशेने चालली आहे, असा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा उभा राहिला आहे. एका बाजूला चिमुकल्या मुलींवर दुष्कृत्य झाल्याचे स्पष्ट संकेत असतानाही, गर्भवती आईला रात्रभर पोलीस चौकीत बसवून ठेवले जाते, तरीही गुन्हा नोंदवला जात नाही. तर दुसऱ्या बाजूला सोशल मीडियावर व्हिडीओ किंवा पोस्ट केल्याच्या आरोपाखाली यंत्रणा इतकी कर्तव्यदक्ष होते की कायद्याचा वापर थेट दडपशाहीसाठी केला जातो. हाच का तो 'कायद्याचा राज्यकारभार' आणि 'सुशासन' याचा गवगवा?

गुन्ह्याचे बळी ठरलेले, अत्यंत असहाय्य नागरिक न्यायासाठी पोलिस ठाण्याचे उंबरठे झिजवत असताना त्यांच्याकडे पाठ फिरवली जाते. बलात्कार, लैंगिक अत्याचार यासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये तातडीने FIR नोंदवणे ही कायदेशीर आणि नैतिक जबाबदारी असते. मात्र प्रत्यक्षात मात्र पीडितांना अपमान, मानसिक त्रास आणि उपेक्षाच मिळते. हा केवळ प्रशासकीय हलगर्जीपणा नाही, तर तो थेट न्यायप्रक्रियेवरचा अन्याय आहे.

याच वेळी, सरकारविरोधात किंवा सत्ताधाऱ्यांना अस्वस्थ करणाऱ्या पोस्ट्स, व्हिडीओ किंवा मतप्रदर्शनांवर मात्र गृहखाते अत्यंत 'कार्यक्षम' बनते. सोशल मीडियावर मत मांडणे हा इतका मोठा गुन्हा ठरतो की कायद्याचे कलम, पोलीस यंत्रणा आणि प्रशासकीय ताकद झटपट वापरली जाते. हा विरोधाभास काय सांगतो? कायदा सर्वांसाठी समान आहे की तो सत्ताधाऱ्यांच्या सोयीने वापरला जातो?

या पार्श्वभूमीवर यूकेमध्ये वास्तव्यास असलेले डॉक्टर आणि यूट्यूबर डॉ. संग्राम पाटील यांच्याशी घडलेला प्रकार अधिकच अस्वस्थ करणारा आहे. भारतीय, मराठी आणि ब्रिटिश नागरिक असलेल्या पाटील यांना कोणतीही अधिकृत लेखी सूचना न देता मुंबई विमानतळावर थांबवण्यात आले. त्यांना इंग्लंडला परत जाण्यापासून रोखण्यात आले आणि त्यांची मँचेस्टरची फ्लाईट चुकली. हा सगळा प्रकार त्यांच्या फेसबुक पोस्ट्समुळे झाल्याचा आरोप केला जात आहे. जर एखाद्या नागरिकाच्या प्रवासावर निर्बंध घालायचे असतील, तर त्यासाठी कायदेशीर प्रक्रिया, अधिकृत आदेश आणि स्पष्ट कारणे असणे आवश्यक असते. ती नसताना असे अघोषित निर्बंध लादणे म्हणजे कायद्याचा गैरवापर नव्हे तर काय?

लोकशाहीत सत्तेला प्रश्न विचारणे, टीका करणे, असहमती व्यक्त करणे हे गुन्हे नसतात; ती नागरिकांची मूलभूत हक्क आहेत. पण आज चित्र उलटे झाले आहे. प्रश्न विचारणारे, अभ्यासू, तर्क करणारे नागरिक 'देशद्रोही' ठरवले जात आहेत, तर द्वेष, हिंसा आणि अन्यायाकडे डोळेझाक केली जात आहे. ही वाटचाल लोकशाहीकडून हुकूमशाहीकडे जाणारी नाही तर काय?

'लोकशाहीची जननी', 'हिंदुराष्ट्र', 'विश्वशक्ती' अशा घोषणा दिल्या जात असताना, प्रत्यक्षात मात्र नागरिकांच्या स्वातंत्र्यावर, अभिव्यक्तीवर आणि न्यायाच्या हक्कावर गदा येत आहे. कायद्याचा अभ्यास जर पीडितांना न्याय देण्यासाठी नव्हे, तर विरोधकांना दाबण्यासाठी वापरला जात असेल, तर तो कायद्याचा विजय नसून लोकशाहीचा पराभव आहे.

महाराष्ट्राने नेहमीच पुरोगामी विचार, सामाजिक न्याय आणि संविधानिक मूल्यांचा वारसा जपला आहे. आज त्याच महाराष्ट्रात गृहखाते कायद्याचा वापर निवडक पद्धतीने करत असल्याचे चित्र दिसत आहे. हा इशारा गंभीर आहे. कारण आज जर हा अन्याय 'इतरांवर' होत असेल, तर उद्या तो कुणावरही होऊ शकतो.


प्रश्न इतकाच आहे, कायदा सत्तेसाठी आहे की नागरिकांसाठी? आणि गृहमंत्री महाराष्ट्राला सुरक्षित करत आहेत की भयग्रस्त? या प्रश्नांची उत्तरे देण्याची जबाबदारी सत्तेवर आहे. नाहीतर इतिहास अशा काळाची नोंद 'कायद्याच्या नावाखाली अन्यायाचा काळ' म्हणून करेल.

# नेताजी सुभाषचंद्र बोस : समताधिष्ठित राष्ट्रनिर्मितीचा तेजस्वी मार्ग

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा केवळ राजकीय सत्तांतराचा दस्तऐवज नसून तो भारतीय समाजाच्या आत्मसन्मानाचा, सामाजिक परिवर्तनाचा आणि मानवी प्रतिष्ठेच्या पुनर्स्थापनेचा प्रदीर्घ संघर्ष आहे. या संघर्षात अनेक थोर नेत्यांनी आपले विचार, कृती आणि बलिदान यांच्या माध्यमातून राष्ट्राला नवी दिशा दिली. मात्र या सर्वांमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे व्यक्तिमत्त्व विलक्षण तेजस्वी, धैर्यशील आणि दूरदृष्टीपूर्ण होते. नेताजी हे केवळ सशस्त्र क्रांतीचे नेतृत्व करणारे योद्धा नव्हते, तर ते भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि नैतिक पुनर्रचनेचे स्वप्न पाहणारे महान समाजचिंतक होते. २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिशातील कटक येथे जन्मलेले नेताजी संपूर्ण आयुष्य देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झटले.

नेताजींच्या जीवनकार्याचा विचार करताना हे स्पष्टपणे जाणवते की, त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्याचा अर्थ अत्यंत व्यापक होता. परकीय सत्तेपासून मुक्त होणे हे स्वातंत्र्याचे केवळ पहिले पाऊल आहे, असे ते मानत. त्यांच्या मते, खरे स्वातंत्र्य तेव्हाच प्राप्त होईल, जेव्हा भारतीय समाजातील प्रत्येक व्यक्तीला सामाजिक न्याय, आर्थिक संधी, मानवी सन्मान आणि सुरक्षित जीवनाचा अधिकार मिळेल. जात, धर्म, वर्ग, लिंग किंवा भाषेच्या आधारे होणारा भेदभाव संपुष्टात येऊन समतावादी समाजरचना निर्माण होणे, हाच त्यांच्या स्वातंत्र्यसंकल्पनेचा केंद्रबिंदू होता. नेताजींच्या सामाजिक जाणीवेची मुळे त्यांच्या बालपणातच रुजलेली दिसतात. ब्रिटिश सत्तेच्या अन्यायकारक धोरणांचा, भारतीयांवरील अपमानास्पद वागणुकीचा आणि देशातील दारिद्र्याचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. शिक्षणाच्या काळात स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा त्यांच्या मनावर खोलवर प्रभाव पडला. आत्मगौरव, आत्मविश्वास, सेवा, त्याग आणि मानवतावाद या मूल्यांनी नेताजींच्या व्यक्तिमत्त्वाची घडण केली. आयसीएससारख्या सर्वोच्च सेवेत यश मिळवूनही त्या पदाचा त्याग करून त्यांनी स्वातंत्र्यलढ्याचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय केवळ राजकीय नव्हता, तर तो सामाजिक बांधिलकीचा आणि नैतिक धैर्याचा ठोस आविष्कार होता.

भारतीय समाजातील जातीय विषमता आणि अस्पृश्यता ही नेताजींसाठी अत्यंत वेदनादायी बाब होती. जन्माच्या आधारे माणसामाणसांत भेद करणे हे अमानवी असून राष्ट्राच्या एकात्मतेसाठीही घातक आहे, असे त्यांचे ठाम मत होते. जातिव्यवस्थेमुळे समाजाचा मोठा वर्ग शिक्षण, रोजगार, सामाजिक सन्मान आणि मानवी हक्कांपासून वंचित राहिला होता. नेताजींनी या अन्यायाविरुद्ध केवळ शब्दांत नव्हे, तर कृतीतूनही संघर्ष केला. आजाद हिंद सेनेत जात, धर्म किंवा प्रांत यांचा कोणताही भेद न ठेवता सर्वांना समान संधी देण्यात आली.



सैनिकांना एकाच पंक्तीत उभे राहून भोजन करणे, समान शिस्त पाळणे आणि एकाच ध्येयासाठी लढणे, ही सामाजिक समतेची जिवंत उदाहरणे होती.

स्त्री–सक्षमीकरण हा नेताजींच्या सामाजिक कार्याचा अत्यंत महत्त्वाचा आणि क्रांतिकारी पैलू होता. त्या काळातील भारतीय समाजात स्त्रियांना प्रामुख्याने दुय्यम आणि मर्यादित भूमिका दिली जात होती. मात्र नेताजींनी स्त्रियांकडे राष्ट्रनिर्मितीतील समान भागीदार म्हणून पाहिले. आजाद हिंद सेनेतील 'राणी झाशी रेजिमेंट' ही भारतीय इतिहासातील स्त्री–मुक्तीची ऐतिहासिक घटना होती. स्त्रियांना शस्त्र हातात घेऊन राष्ट्रासाठी लढण्याची संधी देणे म्हणजे केवळ लष्करी धोरण नव्हते, तर ते सामाजिक क्रांतीचे प्रतीक होते. नेताजींच्या मते, जो समाज आपल्या अर्ध्या लोकसंख्येला दुर्लक्षित ठेवतो, तो समाज कधीही खऱ्या अर्थाने स्वतंत्र आणि प्रगत होऊ शकत नाही.

नेताजींच्या सामाजिक विचारांमध्ये आर्थिक न्यायाला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. ब्रिटिश राजवटीत भारतीय अर्थव्यवस्था शोषणावर आधारित होती. शेतकरी, कामगार आणि कष्टकरी वर्ग दारिद्र्य, कर्जबाजारीपणा आणि असुरक्षिततेच्या गर्तेत अडकलेला होता. नेताजी समाजवादी विचारसरणीने प्रभावित होते. त्यांच्या मते, स्वातंत्र्यानंतर भारताने अशी आर्थिक व्यवस्था स्वीकारली पाहिजे, जिथे संपत्ती काही मोजक्या लोकांच्या हातात केंद्रित न राहता समाजाच्या सर्व घटकांच्या कल्याणासाठी वापरली जाईल. राज्याने लोककल्याणकारी भूमिका बजावून आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी सर्वांपर्यंत पोहोचवाव्यात, अशी त्यांची भूमिका होती.

धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता हे नेताजींच्या सामाजिक कार्याचे अत्यंत महत्त्वाचे आधारस्तंभ होते. भारत हा विविध धर्म, भाषा आणि संस्कृतींचा देश आहे आणि ही विविधताच भारताची खरी ओळख आहे, असा त्यांचा विश्वास होता. ब्रिटिशांनी 'फोडा आणि राज्य करा' या धोरणातून धार्मिक आणि सामाजिक तेढ निर्माण केली होती. नेताजींनी या धोरणाचा तीव्र विरोध केला. आजाद हिंद सेनेत हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन सर्वजण एकत्र येऊन 'जय हिंद'चा नारा देत लढत होते. हा नारा केवळ युद्धघोष नव्हता, तर सामाजिक एकात्मतेचे आणि राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक होता.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, असे नेताजी ठामपणे मानत. ब्रिटिश शिक्षणपद्धती ही भारतीयांना मानसिक गुलामगिरीत ठेवणारी आहे, अशी त्यांची टीका होती. शिक्षणातून केवळ नोकरदार तयार न होता स्वाभिमानी, राष्ट्रभक्त आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव असलेले नागरिक घडले पाहिजेत, असे त्यांचे मत होते. युवकांनी शिक्षणाचा उपयोग केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी न करता समाजाच्या उन्नतीसाठी करावा, असा त्यांचा आग्रह होता.

नेताजींच्या सामाजिक विचारांमध्ये शिस्त, कर्तव्यभावना आणि नैतिक मूल्यांना अत्यंत महत्त्व होते. त्यांच्या मते, स्वातंत्र्य म्हणजे केवळ अधिकार नव्हे, तर जबाबदाऱ्यांची जाणीवही आहे. आजाद हिंद सेनेतील कठोर शिस्त ही केवळ लष्करी गरज नव्हती, तर भावी भारतीय समाजासाठीचा नैतिक आदर्श होती. भ्रष्टाचार, स्वार्थ आणि नैतिक अधःपतन यांचा त्यांनी तीव्र निषेध केला.

युवाशक्तीवर नेताजींचा अपार विश्वास होता. युवक हे राष्ट्राचे खरे शिल्पकार असून सामाजिक परिवर्तनाची जबाबदारी त्यांच्यावरच आहे, असे ते मानत. भीती, न्यूनगंड आणि निष्क्रियता यांचा त्यांनी तीव्र निषेध केला. ध्येयासाठी सर्वस्व अर्पण करण्याची तयारी, त्यागाची वृत्ती आणि राष्ट्रासाठी बलिदान देण्याची क्षमता हीच युवकांची खरी ओळख असावी, असा त्यांचा संदेश होता.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे सामाजिक कार्य आजच्या काळात अधिकच अर्थपूर्ण वाटते. वाढती आर्थिक विषमता, बेरोजगारी, स्त्री–असमानता, सामाजिक तणाव आणि सांप्रदायिकता यांसारख्या समस्या आजही आपल्या समाजासमोर उभ्या आहेत. अशा परिस्थितीत नेताजींचा समतावादी, शिस्तप्रिय आणि राष्ट्रकेंद्री दृष्टिकोन आपल्याला मार्गदर्शक ठरतो. त्यांच्या विचारांमध्ये केवळ संघर्षाची भाषा नाही, तर समाजबांधणीची स्पष्ट दिशा आहे.

२३ जानेवारी रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करताना त्यांच्या केवळ शौर्याचे नव्हे, तर त्यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या स्वप्नाचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. सामाजिक न्याय, समता, बंधुता, स्त्री–समानता, आर्थिक समतोल आणि मानवी प्रतिष्ठेवर आधारित भारत निर्माण करणे हेच नेताजींना खरे अभिवादन ठरेल. नेताजी हे इतिहासातील एक महान योद्धा नसून ते आजही भारतीय समाजाच्या आत्म्याला प्रेरणा देणारे जिवंत विचार आहेत.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

## कार्यकर्त्यांची गरज संपलेले राजकारण

# लोकशाहीच्या मुळावर उठलेली 'कॉन्ट्रॅक्ट संस्कृती'

एकेकाळी ग्रामीण महाराष्ट्रात लग्नसोहळा म्हणजे संपूर्ण गावाचा उत्सव असायचा. मांडव उभारण्यापासून पंगत वाढण्यापर्यंत प्रत्येक कामासाठी माणसं लागायची. मित्र, नातेवाईक, शेजारी हेच खरे आधारस्तंभ असायचे. 'आज आपण मदत केली, उद्या आपल्याला गरज भासेल,' या भावनेतून माणसं एकमेकांशी जोडलेली होती. त्या काळात सामाजिक नातेसंबंध हे गरजेवर आधारित होते, पण त्यामागे आपुलकी होती, सहभाग होता.

मात्र काळ बदलला. मंगल कार्यालये आली, केटरर्स आले, संपूर्ण लग्नाचा 'कॉन्ट्रॅक्ट' घेणारी यंत्रणा उभी राहिली. आर्थिक समृद्धी वाढली आणि त्याबरोबरच माणसामाणसांवरील अवलंबित्व कमी झाले. आता व्हॉट्सॲपवर पत्रिका पाठवली जाते, लग्न उरकले जाते आणि कोणाची कोणाला गरज उरत नाही. सोयी वाढल्या, पण संबंध पातळ झाले.

आज हाच बदल राजकारणात अधिक भयावह स्वरूपात दिसतो आहे.

पूर्वी निवडणूक म्हणजे कार्यकर्त्यांचा उत्सव असायचा. उमेदवाराकडे फार पैसा नसायचा, पक्षाकडूनही मर्यादित मदत मिळायची. त्यामुळे स्टेज उभारणे, सतरंज्या टाकणे, पोस्टर लावणे, फेरी काढणे, मतदारांपर्यंत पोहोचणे या सगळ्यासाठी कार्यकर्तेच लागायचे. नेता कार्यकर्त्यावर अवलंबून असायचा आणि म्हणूनच तो त्याला जपत असे, त्याचा मान राखत असे. कार्यकर्ता म्हणजे केवळ मतांची मशीन नव्हे, तर राजकारणाचा कणा होता.

आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. पक्षांकडे प्रचंड निधी आहे, उमेदवारांकडे बेहिशेबी पैसा आहे. स्टेज, पोस्टर, माणसं, गर्दी, मिरवणूक, नाच सगळं काही विकत घेता येतं. सभा भरवण्यासाठी कार्यकर्ते लागतातच असे नाहीत; पैसे दिले की माणसं उभी राहतात. प्रचार यंत्रणा ही माणसांवर नव्हे तर पैशांवर चालते.

मग प्रश्न उरतो कार्यकर्त्यांची गरजच काय?

नगरपालिका, महापालिका निवडणुकांमधून हे वास्तव अधिक ठळकपणे समोर येते आहे. आज कार्यकर्ता नव्हे, तर 'पैशाने गब्बर' नेता हवा आहे. विचार, निष्ठा, पक्षाशी बांधिलकी या गोष्टी दुय्यम ठरत चालल्या आहेत. जो खर्च करू शकतो, तोच 'लोकप्रिय' ठरतो. लोकशाहीतील सहभागाची जागा आता आर्थिक व्यवहारांनी घेतली आहे.

हे चित्र केवळ राजकारणापुरते मर्यादित नाही; ते समाजातील व्यापक बदलाचे द्योतक आहे. जसे गावातल्या लग्नात वाढायला मित्र लागत नाहीत, तसेच राजकारणातही आता कार्यकर्ते लागत नाहीत. पण प्रश्न असा आहे की, माणसांशिवाय समाज चालतो का? आणि कार्यकर्त्यांशिवाय लोकशाही टिकू शकते का?

कार्यकर्ते म्हणजे लोकशाहीचे रक्ताभिसरण आहे. ते नसतील, तर राजकारण केवळ धनदांडग्यांचा खेळ बनेल. सामान्य माणसाचा आवाज हरवेल, सहभाग संपेल आणि लोकशाही हळूहळू एका कॉर्पोरेट करारासारखी होऊन जाईल.

आज कार्यकर्त्यांची गरज संपलेली नाही, तर जाणीवपूर्वक संपवली जात आहे पैशाच्या ताकदीने. हा प्रवाह थांबवला नाही, तर उद्या मतदारही केवळ 'कॉन्ट्रॅक्ट'वर उभे राहतील. आणि त्या दिवशी लोकशाहीचे औपचारिक अस्तित्व राहील, पण तिचा आत्मा मात्र हरवलेला असेल.

**– हेरंब कुलकर्णी यांच्या विचारांवर आधारित**

## सचिन ओंम्बासे NCL प्रकरण :

# चौकशीवर आक्षेप; स्वतंत्र IAS अधिकाऱ्यांकडून तपासाची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वढरउ नागरी सेवा परीक्षेत सामान्य (General) प्रवर्गातून चार प्रयत्न पूर्ण केल्यानंतर चुकीची माहिती सादर करून नॉन–क्रिमिलियर लेयर (NCL) प्रमाणपत्र मिळवून क्श्अर सेवेत प्रवेश केल्याचा गंभीर आरोप असलेल्या सचिन ओंम्बासे प्रकरणात आता नवे आणि महत्त्वाचे वळण आले आहे. या प्रकरणातील चौकशी प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करत सत्यशोधक, माहिती अधिकार कार्यकर्ते बाळासाहेब वसंतराव सुभेदार यांनी महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागातील अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांच्याकडे सखोल, निष्पक्ष आणि स्वतंत्र चौकशीची ठाम मागणी केली आहे.

तक्रारीची गंभीर दखल घेत वढरउने या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश केंद्र शासनाला दिले होते. त्यानंतर हे प्रकरण राज्याच्या अपर मुख्य सचिव (सेवा) कार्यालयाकडे वर्ग करण्यात आले. मात्र, चौकशी विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडे सोपवण्यात आल्याने चौकशीच्या निष्पक्षतेबाबत संशय निर्माण झाल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे.

२५ मार्च २०१३ च्या तथाकथित Umbrella शासन निर्णयाचा दाखला देत तक्रारदार सुभेदार यांनी ठउछ निकषांचा सविस्तर खुलासा केला आहे. त्यांच्या मते, वेतनाद्वारे मिळणारे उत्पन्न आणि इतर मार्गांने मिळणारे उत्पन्न (शेती उत्पन्न वगळून) हे दोन्ही उत्पन्न स्वतंत्रपणे मोजले जाते. मागील सलग तीन वर्षांपैकी कोणतेही एक उत्पन्न ₹4.5 लाखांपेक्षा जास्त असल्यास NCL प्रमाणपत्र देणे नियमबाह्य ठरते. दोन्ही उत्पन्नांची बेरीज करून मर्यादा ठरवण्याचा प्रश्नच येत नाही, हे शासन निर्णयातील उदाहरणांमधून स्पष्ट होते,



असा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच, २२ जानेवारी २०१३ च्या जुन्या शासन निर्णयाचा सोयीस्कर अर्थ लावून संबंधित उमेदवाराने स्वतःला वाचवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. २५ मार्च २०१३ च्या Umbrella GR मध्ये याआधीचे सर्व शासन निर्णय एकत्रित व सुसूत्रीकृत करण्यात आलेले असल्याचे तक्रारदाराने अधोरेखित केले आहे.

चौकशी प्रक्रियेवर आणखी गंभीर आक्षेप घेत तक्रारीत नमूद करण्यात आले आहे की, विभागीय आयुक्तांनी स्वतंत्र तपास न करता केवळ सातारा जिल्हाधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अहवालाचे इंग्रजी भाषांतर सादर केले. त्यामुळे वस्तुनिष्ठ आणि स्वतंत्र चौकशी झाल्याचा दावा करता येत नाही, असे तक्रारदाराचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे, संबंधित अधिकारी सातारा जिल्ह्याशी संबंधित असल्याने कनिष्ठ अधिकाऱ्यांकडून कठोर व निर्भीड अहवाल येण्याची शक्यता कमी असल्याचा दावाही तक्रारीत करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर चौकशी ही कठोर व निष्पक्ष कारवाईसाठी ओळखले जाणारे वरिष्ठ क्श्अर अधिकारी तुकाराम मुंडे किंवा प्रवीण गेडाम यांच्याकडून करण्यात यावी, अथवा अपर मुख्य सचिव (सेवा) यांनी स्वतः ही चौकशी करावी, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे. तसेच चौकशीदरम्यान तक्रारदारास आपली बाजू मांडण्याची संधी देण्याचीही मागणी नोंदवण्यात आली आहे.

तक्रारीतील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, चौकशी पूर्ण होईपर्यंत सचिन ओंम्बासे यांना सोलापूर महानगरपालिका आयुक्त या कार्यकारी पदावरून दूर ठेवण्यात यावे. सुमारे १३०० कोटी रुपयांच्या बजेटशी संबंधित आर्थिक निर्णयांच्या पदावर कार्यरत असताना चौकशीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रभाव पडण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा गंभीर इशारा तक्रारदाराने दिला आहे.

एकूणच, NCL निकषांची व्याख्या, शासन निर्णयांचा अर्थ लावण्याची पद्धत, चौकशीची स्वायत्तता आणि प्रशासकीय पारदर्शकता या सगळ्या मुद्द्यांवर या प्रकरणाने गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. आता राज्य शासन या प्रकरणाकडे किती गांभीर्याने पाहते, चौकशी स्वतंत्र आणि निष्पक्ष होते का, तसेच प्रशासनात उत्तरदायित्व निश्चित होते का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# ईव्हीएम, पैसा आणि सत्तेच्या गैरवापरामुळे भाजपचा विजय : शिंदे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत भाजप नव्हे, तर ईव्हीएमच निवडून आला आहे, अशी जोरदार टीका खा. प्रणिती शिंदे यांनी केली. काँग्रेसचे अनेक उमेदवार निवडणूकपूर्व सर्व्हेमध्ये आघाडीवर होते. मात्र ईव्हीएममधील घोळ, पैसा व सत्तेचा गैरवापर यामुळे भाजपचे उमेदवार विजयी झाल्याचा आरोप त्यांनी केला.

महानगरपालिका निवडणुकीनंतर काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांची व कार्यकर्त्यांची आढावा बैठक सोलापूर शहर जिल्हा काँग्रेसचे प्रभारी मोहन जोशी, खा. प्रणिती शिंदे आणि प्रमुख नेतेमंडळींच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीत निवडणुकीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

खा. प्रणिती शिंदे पुढे म्हणाल्या की, गेल्या नऊ–दहा वर्षांत भाजपचा भ्रष्टाचारी कारभार, टेंडरमधील टक्केवारी, प्रशासकीय नाकर्तेपणा, अघोषित आणीबाणीचे वातावरण तसेच धार्मिक तेढ निर्माण करून सत्तेचा गैरवापर करण्यात आला आहे. सर्व शासकीय यंत्रणा आणि निवडणूक आयोगाचा वापर करून भाजपने विजय मिळविल्याचा आरोपही त्यांनी केला.

महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेसच्या सामान्य कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे संघर्ष केला असून, पराभवाने खचून न जाता नव्या जोमाने कामाला लागा, असे



आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. आगामी निवडणुकांसाठी काँग्रेस पक्ष नव्याने उभा करण्याचा निर्धारही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

दरम्यान, शहर जिल्हा काँग्रेसचे संपर्कप्रमुख मोहन जोशी यांनीही भाजपवर टीका करताना सांगितले की, काँग्रेसच्या जीवावर राजकीय कारकीर्द घडवलेले काही नेते आज काँग्रेसवरच टीका करत आहेत. त्यांचे प्रस्थ काँग्रेसमुळेच निर्माण झाले असून, भाजपच्या कार्यकर्त्यांपेक्षा जास्त निष्ठा दाखवण्यासाठी ते खासदार प्रणिती शिंदे यांच्यावर टीका करत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे नाव न घेता टीका केली.

या बैठकीस शहराध्यक्ष चेतन नरोटे, नगरसेवक नरसिंह आसादे, माजी महापौर संजय हेमगड्डी, आरिफ शेख, माजी नगरसेवक रियाज हुंडेकरी, प्रवीण निकाळजे, नरसिंग कोळी, प्रवक्ते अशोक निंबर्गी, वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील रसाळे, महिला काँग्रेस अध्यक्षा प्रमिला तुपलवंडे, युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश डोंगरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# न्यायाला विलंब म्हणजे अन्यायालाच पाठबळ

## न्यायव्यवस्थेच्या भूमिकेवर ॲड. असिम सरोदे यांचे परखड मत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 'अत्यंत संयमित शब्दांत सांगायचे झाल्यास, आज महाराष्ट्रातीलच नव्हे तर संविधान समजणाऱ्या आणि लोकशाहीवर प्रेम करणाऱ्या प्रत्येक नागरिकाच्या सहनशीलतेची परीक्षा पाहिली जात आहे,' असे परखड मत ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. असिम सरोदे यांनी व्यक्त केले आहे. महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष प्रकरणाच्या निमित्ताने न्यायप्रक्रियेत होणाऱ्या विलंबावर त्यांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

ॲड. सरोदे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, संविधानिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या प्रकरणांकडे सातत्याने दुर्लक्ष होणे म्हणजे केवळ न्यायव्यवस्थेचा नव्हे, तर थेट संविधानाचाच अपमान आहे. अशा प्रकरणांमध्ये 'तारीख पे तारीख' ही प्रक्रिया सामान्य नागरिकांच्या संयमाचा अंत पाहणारी ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

### 'न्यायालयाचा अवमान' हे शस्त्र?

न्यायव्यवस्थेतील काही घटकच जेव्हा तारखा घेणे, देणे आणि विलंब स्वीकारणे या प्रक्रियेचा भाग बनतात, तेव्हा त्यावर प्रश्न विचारले की लगेच 'न्यायालयाचा अवमान' या संकल्पनेचा वापर शस्त्रासारखा केला जातो, अशी टीका सरोदे यांनी केली.

'एखाद्या क्षणी सनी देओलच्या 'तारीख पे तारीख' संवादासारखी वैतागलेली



जनता उभी राहिली, तर ती परिस्थिती हाताळण्याची तयारी न्यायसंस्थेकडे आहे का?' असा थेट सवालही त्यांनी उपस्थित केला.

### न्यायाधीश म्हणजे संविधानाचे विश्वस्त

न्यायाधीश हे केवळ पदाधिकारी नसून संविधानाचे विश्वस्त आहेत, याची आठवण करून देत सरोदे म्हणाले की, असंविधानिकता दूर करण्याची जबाबदारी ज्यांनी स्वीकारली आहे, त्यांनी स्वतःवर असलेली कायदेशीर व नैतिक जबाबदारी पार पाडणे अनिवार्य आहे. नागरिकांनी न्यायसंस्थेवर विश्वास ठेवावा, मान–सन्मान द्यावा, यासाठी न्यायप्रक्रियेत पारदर्शकता आणि वेग असणे तितकेच आवश्यक आहे.

### विलंबातून 'अन्यायाचे समर्थन' दिसू नये

न्याय देण्यात होणारा विलंब हा केवळ प्रशासकीय प्रश्न नसून तो लोकशाहीसाठी घातक ठरू शकतो, असा इशाराही त्यांनी दिला.

'न्यायाला विलंब होत असताना आपण सगळेच जण नकळत अन्यायाच्या बाजूने उभे आहोत, असे चित्र निर्माण होणे अत्यंत धोकादायक आहे,' असे सरोदे यांनी ठामपणे नमूद केले.

### लोकशाहीसाठी इशारा

महाराष्ट्रातील सुमारे १२.३० कोटी जनता, देश–विदेशातील मराठी समाज आणि संविधानप्रेमी नागरिक हे सारे घडामोडी बारकाईने पाहत असल्याचे त्यांनी सांगितले. न्यायव्यवस्थेवरील विश्वास टिकवायचा असेल, तर संवेदनशील आणि संविधानिक महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये वेळेत निर्णय देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

ॲड. असिम सरोदे यांच्या या वक्तव्यामुळे न्यायप्रक्रियेतील विलंब, लोकशाहीतील जबाबदारी आणि संविधानिक मूल्यांचे संरक्षण या मुद्द्यांवर नव्याने चर्चा सुरू होण्याची शक्यता आहे.

## वात्रटिका

### खेळ आणि आवमेळ

खुराक दिला घोड्याला तरी
तबेल्यातून पलायन केले...
भाऊही कामाला नाही आला
त्यांने दुसऱ्याचे कल्याण केले...
आजवर आपण पाहिले
काका पुतण्याचे खेळ...
आता आपणास बघायचा
भावा भावातील आवमेळ...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# चार वर्षांनंतर जि.प.मध्ये लोकप्रतिनिधी येणार; निवडणूक प्रक्रिया सुरू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 'मिनी मंत्रालय' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोलापूर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी प्रशासनाने प्रक्रिया सुरू केली आहे. फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यानंतर जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच विविध समित्यांच्या सभापतींची निवड होणार असून, त्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद भवनातील पदाधिकाऱ्यांसाठी राखीव दालनांची दुरुस्ती युद्धपातळीवर सुरू करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील तसेच बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांनी मंगळवारी पदाधिकाऱ्यांच्या दालनांची प्रत्यक्ष पाहणी केली. मागील चार वर्षांपासून जिल्हा परिषदेत प्रशासकीय राजवट असल्याने लोकप्रतिनिधी नसल्यामुळे पदाधिकाऱ्यांसाठी राखीव असलेली अनेक दालने कुलूपबंद होती, तर काही दालने प्रशासकीय कामकाजासाठी वापरण्यात येत होती.



जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून ७ फेब्रुवारीला निकाल जाहीर करण्यात येणार आहे. त्यानंतर पुढील सात दिवसांत जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड प्रक्रिया पूर्ण होणार आहे. त्यानंतर कृषी व पशुसंवर्धन, अर्थ व बांधकाम, शिक्षण व आरोग्य तसेच समाजकल्याण समितीच्या सभापतींची निवड होणार असून, फेब्रुवारी अखेरपर्यंत सर्व पदाधिकाऱ्यांच्या निवडी पूर्ण होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, पदाधिकाऱ्यांसाठी राखीव असलेली आणि दीर्घकाळापासून बंद असलेली दालने दुरुस्त करण्यात येत असून, सध्या प्रशासकीय कारणांसाठी वापरण्यात येणारी काही दालने पुन्हा पदाधिकाऱ्यांसाठी राखीव करण्यात येणार आहेत. याशिवाय जिल्हा परिषदेत विरोधी पक्षनेते व सभागृह नेते यांच्यासाठी स्वतंत्र दालने उपलब्ध करून देण्याची कार्यवाहीही प्रशासनाकडून सुरू आहे.

# सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय : मुख्याध्यापकांनाही 'टीईटी'ची अट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गांवर अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण असणे बंधनकारक असल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. मात्र, हा निर्णय केवळ शिक्षकांसाठी असून मुख्याध्यापकांना लागू नाही, असा संभ्रम काही काळ निर्माण झाला होता. याबाबत आता माध्यमिक शिक्षण विभागाने स्पष्ट भूमिका मांडत मुख्याध्यापकांनाही 'टीईटी'ची अट लागू असल्याचे जाहीर केले आहे.

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (एनसीटीई)ने सन २०१० पासून शाळांमधील शिक्षकांसाठी 'टीईटी'ची अट लागू केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सध्या सेवेत असलेल्या आणि ५३ वर्षांपर्यंत वय असलेल्या शिक्षकांना दोन वर्षांच्या आत 'टीईटी' उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आले आहे. ठरलेल्या मुदतीत पात्रता पूर्ण न केल्यास संबंधित शिक्षकांवर सक्तीच्या सेवानिवृत्तीची कारवाई होऊ शकते.

विस्ताराधिकारी, गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख तसेच मुख्याध्यापक पदावरील पदोन्नतीसाठी आता 'टीईटी' उत्तीर्ण असणे आवश्यक ठरणार आहे. याशिवाय शिक्षकांच्या निवड प्रक्रियेसह वरिष्ठ वेतनश्रेणीसाठीही 'टीईटी'ची अट लागू करण्यात आली आहे.

या निर्णयाचा परिणाम म्हणून सध्या सोलापूर जिल्हा परिषदेत सुमारे ३५ ते ४० शाळांची जबाबदारी प्रभारी मुख्याध्यापकांकडे देण्यात आली आहे. १२ ते २० वर्षांहून अधिक सेवा केलेल्या अनेक शिक्षकांनाही आता वेतनश्रेणीसाठी 'टीईटी' उत्तीर्ण होणे अनिवार्य ठरणार आहे. त्यामुळे अनेक शिक्षकांना उतारवयातही उन्हाळी सुट्टीत 'टीईटी'च्या तयारीस लागावे लागणार आहे. इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गावर माध्यमिक शाळेत नियुक्त असलेल्या बीएडधारक शिक्षकांनाही 'टीईटी'ची अट लागू असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. निवृत्तीस पाच वर्षांपेक्षा कमी कालावधी शिल्लक असलेले शिक्षक वगळता, इतर सर्व शिक्षकांना दोन वर्षांच्या आत 'टीईटी' उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. राज्य शासनाने सर्व जिल्ह्यांकडून 'टीईटी' उत्तीर्ण व अनुत्तीर्ण शिक्षकांची सविस्तर माहिती मागवली असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गांवर नियुक्त शिक्षक तसेच मुख्याध्यापकांना 'टीईटी' उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. दिलेल्या मुदतीत पात्रता पूर्ण करणे आवश्यक आहे.

**- सचिन जगताप,** माध्यमिक शिक्षणाधिकारी, सोलापूर

# सोलापूर जिल्ह्यात २८ फेब्रुवारी रोजी महा विधी सेवा शिबीराचे आयोजन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मा. मुंबई उच्च न्यायालय तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या सुचनेनुसार आणि प्रमुख जिल्हा न्यायाधीश मा. श्री. मनोज शर्मा यांच्या निदेर्शानुसार सोलापूर जिल्ह्यात दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी महा विधी सेवा शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे.

या शिबिरास सोलापूर न्यायिक जिल्ह्याचे पालक न्यायमुर्ती एन. जे. जमादार (मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ कोल्हापूर) तसेच न्यायमुर्ती फिरदोश पुनीवाला (मुंबई उच्च न्यायालय) उपस्थित राहणार आहेत.

**शिबिराचे उद्दिष्ट**

- शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांविषयी समाजात जागरुकता निर्माण करणे
- कल्याणकारी कायद्यांबाबत जनजागृती करणे
- पात्र लाभार्थ्यांना योजनांशी जोडणे व त्यांची कायदेशीर गरज समजून घेणे
- योग्य कायदेशीर सल्ला देऊन समस्या सोडविणे

**शिबिरातील प्रमुख विषय**

- श्रमिक/मजूर कल्याण
- दिव्यांग व्यक्तींचे प्रश्न
- बालकांशी निगडीत मुद्दे
- ट्रान्सजेंडर समुदाय
- कारागृहातील कैदी
- अनुसूचित जाती व जमाती
- जेष्ठ नागरिक
- भिकारी व बेघर व्यक्ती
- रस्ता सुरक्षा व अपघात
- नैसर्गिक आपत्तीग्रस्त
- तस्करीचे पिडीत

सदरील शिबीर जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने आयोजित करण्यात येणार असून जास्तीत जास्त शासकीय कार्यालयांनी सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. शिबीर यशस्वी होण्यासाठी सर्व विभागांचे सहकार्य महत्त्वाचे असल्याचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सचिव प्रशांत पेठकर यांनी पत्राद्वारे कळविले आहे.

# वाहतुकीचे नियम सर्वांच्या हिताचे पालन करणे गरजेचे- महारुद्र परजणे

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** वाहतूक नियमांचे पालन करणे सर्वांच्याच हिताचे असून, प्रत्येक वाहनधारकाने नियमांचे काटेकोर पालन केल्यास अपघाताचे प्रमाण कमी होण्यास निश्चितच मदत होईल असे प्रतिपादन नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांनी केले.

ते नातेपुते पोलीस ठाणे कर्मचारी, पोलीस पाटील व एस. एन. डी. इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलचे आरएसपीचे विद्यार्थी यांनी नातेपुते शहरात रस्ता सुरक्षा सत्ता नमित्त काढण्यात आलेल्या रॅली प्रसंगीच्या कार्यक्रमात बोलत होते. ते पुढे बोलत असताना म्हणाली की, शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे शिक्षण देणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने वाहतूक नियम समजून घेत स्वत:मध्ये शिस्त लावून घेतली पाहिजे. नागरिकांसह सर्व संबंधित यंत्रणांनी वाहतूक नियमांचे पालन करून त्याबाबत व्यापक जनजागृती करावी. अपघात झाल्यास नागरिकांनी अपघातग्रस्तांना तत्काळ मदत करावी. रस्ते अपघात विरहित राहतील यांची दक्षता सर्व यंत्रणेने घ्यावी. प्रत्येकाने सतर्क, जागरूक राहत वाहतुकीच्या नियमांचे पालन केले केले पाहिजे असल्याचेही मत नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांनी नागरिकांना व वाहनचालकांना केले. नातेपुते पोलीस ठाण्याचे कर्मचारी तसेच नातेपुते येथील एस. एन. डी. सीबीएसई स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नातेपुते पोलीस ठाणे येथून नातेपुते शहरातील मेन मेन चौकामध्ये रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्त रॅली काढून नियम पाळा अपघात टाळा वेगावर नियंत्रण जीवन सुरक्षित अशा घोषणा देत अपघात न होऊ नये यासाठी जनजागृती केली. यावेळी नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मनोज राऊत, गोपनीय विभागाचे अमोल देशमुख, वाहतूक सुरक्षा यंत्रणेचे रमेश बोराटे राकेश राव, वर्षा गुळीग, पोलीस पाटील औदुंबर बुधावले तसेच नातेपुते परिसरातील सर्व पोलीस पाटील व एस एन डी सीबीएससी स्कूलचे विद्यार्थी रस्ता सुरक्षा सप्ताह मध्ये सहभागी झाले होते.




रस्ते अपघाताचे सर्वात मोठे कारण म्हणजे वाहनांचा अतिवेग त्यामुळे वाहनांचा अतिवेक कमी केल्यास अनेक अपघात टळू शकतात, दुसरे कारण ओव्हरटेक करण्याची स्पर्धा यामध्ये स्वत:सह इतरांचा जीव धोक्यात टाकू नका, वाहनाने प्रवास करणारे असो किंवा पादचारी असो रस्ता एकेरी असो किंवा दुहेरी रस्त्याच्या डाव्या बाजूने प्रवास करणे सक्तीचे असते, वाहन वळवताना इंडिकेटर करा त्यानंतर दिशा बदला, दारू पिऊन गाडी चालवणे अपघाताला आमंत्रण आहे त्यामुळे कोणतेही परिस्थितीत दारू पिऊन गाडी चालवू नये, गाडी चालवत असताना फोनचा वापर कमी करा वाहन रोडच्या साईटला घेऊन मोबाईलवर बोला, वाहनामध्ये सुरक्षित अंतर ठेवा समोरील वाहनाने ब्रेक मारल्यास अपघात होणार नाही, गरज असल्यास गाडीचा हॉर्न वाजवा विनाकारण गर्दीच्या ठिकाणी हॉर्न वाजवून ध्वनी प्रदूषण करू नका, जर हे वाहतुकीचे नियम वाहनधारकाने पाळले पालन केले तर आपल्याला सुरक्षित प्रवास अनुभवता येईल
**-महारूद्र परजणे,** (सपोनि नातेपुते पोलीस ठाणे )

# सद्भावना तिरंगा केंद्रावर यंदा भारतमाता मूर्ती उपलब्ध

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रजासत्ताक दिनानिमित्त यंदा सद्भावना तिरंगा केंद्रावर विविध तिरंगा साहित्य, मिठाईबरोबरच फायबरची भारतमाता मूर्ती विक्रीस उपलब्ध करण्यात आले आहे, अशी माहिती सद्भावना सेवा दलाचे दिव्यकांत गांधी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

२४ ते २९ जानेवारी यादरम्यान सद्भावना केंदावर तिरंगा वस्तू व मिठाई वितरण करण्यात येणार आहे.

यंदा सद्भावना तिरंगा केंद्रावर ३.५/४ फूटाची फायबरची भारतमाता मूर्ती उपलब्ध आहे. सद्भावना वंदे मातरम मंडळातर्फे प्रजासत्ताक दिन निमित्त, एकता उत्सव कार्यक्रम सद्भावना तिरंगा बंगला येथे साजरा करण्यात येणार आहे. राष्ट्र एकता सूत्र हाती घेऊन आम्ही स्वातंत्र्य दिन प्रजासत्ताक दिन सणाप्रमाणे साजरे करा याचा प्रसार गत ३४ वर्षापासून करीत आहोत. केशव महाराज यांनी २५ वर्षे, सद्भावना केंद्रावर अनेक चविष्ट मिठाई पदार्थ बनवून या राष्ट्रीय उत्सवाची गोडी असंख्य देशभक्तांना पोहचविण्याचे कार्य केले. केशव महाराज यांचे निधन झाल्याने यंदा केंद्रावर त्यांचा मुलगा दत्ता वाघमारे यांनी मिठाई बनविण्याचे कार्य हाती घेतले आहे. मिठाई केंद्रावर ड्रायफ्रुट तिरंगा बर्फी, केशर लाडू, ड्रायफ्रुट मसाला चिवडा, शेव-दाळ, तसेच तिरंगा ध्वज, डायमंड तिरंगा आंगठी, बॅचेस, पितळी तिरंगा, अशोक स्तंभघडयाळ - नकाशा, कापडी तिरंगा, हाताचे बॅंड, मफलर, की चेन, पताका, तिरंगा स्टीकर, तोरण, कॅप, तिरंगा टी शर्ट, तिरंगा ओढणी आदी अनेक वस्तू उपलब्ध आहेत. या पत्रकार परिषदेला ध्रुवेश गांधी, रोशन शेख, सोना गांधी, श्रुती गांधी, स्नेहा गांधी, नारायण छाब्रिया, प्रकाश लोढा, राकेश मालु, मयूर सोलनकर, जयदेव बाहेरमठ आदी उपस्थित होते.

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# MDR-TB रुग्णांसाठी 'BPaLM' औषधोपचार प्रणाली ठरतेय वरदान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** क्षयरोग हा Mycobacterium tuberculosis या सूक्ष्म जीवाणूमुळे होणारा अत्यंत संसर्गजन्य आजार असून खोकताना, शिंकताना किंवा थुंकीद्वारे हवेमधून त्याचा प्रसार होतो. क्षयरोगाचे वेळेत आणि अचूक निदान होणे अत्यंत महत्त्वाचे असून, यासाठी सोलापूर महानगरपालिकेकडे अत्याधुनिक NAAT (Nucleic Acid Amplification Test) तपासणी सुविधा उपलब्ध आहे. या तपासणीद्वारे रुग्णास औषधांना दाद देणारा (Drug Sensitive) की औषधांना दाद न देणारा (Drug Resistant / MDR-TB) क्षयरोग आहे, याचे अचूक वर्गीकरण केले जाते.

या निदानानंतर पात्र रुग्णांना तातडीने 'BPaLM' ही नवीन व आधुनिक औषधोपचार प्रणाली सुरू करण्यात येते. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली, टीबीएचव्ही कर्मचारी व आशाताई यांच्या सहकार्याने सोलापूर महानगरपालिकेच्या सर्व नागरी आरोग्य केंद्रांवर क्षयरोगाचे निदान व उपचार पूर्णतः मोफत दिले जात आहेत.

माननीय पंतप्रधान यांच्या महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत देशातून क्षयरोगाचे उच्चाटन करण्याच्या उद्देशाने सोलापूर महानगरपालिका प्रशासन वेगाने आणि प्रभावीपणे पावले उचलत आहे. केंद्रीय क्षयरोग विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, औषधांना दाद न देणाऱ्या (MDR-TB) रुग्णांसाठी 'BPaLM' ही प्रणाली अत्यंत परिणामकारक ठरत आहे.




**BPALM प्रणालीची वैशिष्ट्ये**

यापूर्वी MDR-TB रुग्णांचा उपचार कालावधी अत्यंत क्लिष्ट असून १८ ते २० महिने इतका दीर्घ होता आणि त्यामध्ये ५ औषधांचा समावेश असायचा. मात्र प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत विकसित करण्यात आलेल्या 'BPaLM' आधुनिक प्रणालीमुळे उपचार कालावधी केवळ ६ महिन्यांवर आला आहे. या उपचारामध्ये केवळ ४ औषधे असून ती अधिक प्रभावी, सुरक्षित आणि रुग्णस्नेही आहेत.

सोलापूर महानगरपालिकेच्या शहर क्षयरोग केंद्रामार्फत जून २०२५ पासून ही प्रणाली यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. सध्या १६ रुग्ण या उपचार पद्धतीखाली आहेत. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे कावेरी या रुग्णीने 'BPaLM' उपचार यशस्वीरीत्या पूर्ण केले असून, यासाठी आशाताई वैशाली आयवळे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. यासोबतच इतर ३ रुग्णांनी देखील आपले उपचार यशस्वीरीत्या पूर्ण केले आहेत.

**आयुक्तांच्या हस्ते सत्कार**

या यशस्वी कामगिरीबद्दल आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन संबंधित आरोग्य कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी क्षयरोग निर्मूलनासाठी कार्यरत असलेल्या आरोग्य यंत्रणेचे विशेष कौतुक करण्यात आले.

**प्रशासनाचे आवाहन**

'क्षयरोगाला घाबरून न जाता, त्याची लक्षणे आढळल्यास नागरिकांनी त्वरित जवळच्या नागरी आरोग्य केंद्रात जाऊन तपासणी करून घ्यावी. वेळेवर निदान व पूर्ण उपचार घेतल्यास क्षयरोग नक्कीच बरा होऊ शकतो,' असे आवाहन सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, उपायुक्त आशिष लोकरे, आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने व शहर क्षयरोग अधिकारी डॉ. अरुंधती हराळकर यांनी संयुक्तपणे केले आहे.


क्षयरोगाची लक्षणे आढळल्यास नागरिकांनी तात्काळ आपल्या जवळच्या नागरी आरोग्य केंद्राशी किंवा सोलापूर महानगरपालिका शहर क्षयरोग केंद्राशी संपर्क साधून या आधुनिक उपचार सुविधेचा लाभ घ्यावा. यासाठी शहर क्षयरोग विभागासह संपूर्ण आरोग्य विभाग अहोरात्र कार्यरत आहे.

'निरोगी नागरिक, सक्षम देश,
हाच खरा विकास
टीबीला हरवूनच होईल, भारताचा विकास.'

**VNP MOTORS**
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
Trusted & Approved for Leading Brands
VNP MOTORS Pvt. Ltd.
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007
GOVT. APPROVED CNG RETROFITMENT CENTER & WORKSHOP

**जाहिर प्रसिध्दीकरण** अर्ज.नं. /२०२५
**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**
कल्पना रामचंद्र शेळके, रा.पापरी, ता.मोहोळ, जि.सोलापूर } अर्जदार
विरूध्द
ग्रामपंचायत पापरी, ता.मोहोळ, जि.सोलापूर }सामनेवाला
ज्याअर्थी वर नमुद अर्जदार कल्पना रामचंद्र शेळके जन्म दि. ९/९/१९८० रोजी पापरी ता.मोहोळ. जि. सोलापूर येथे झाला आहे.
अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे कल्पना रामचंद्र शेळके यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे सप्टेंबर १९८० चे आभिलेखात अर्जदार याची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.७/२/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.२२/१/२०२६. हुकुमावरून
शिक्का
सही/-
तहसिलदार,मोहोळ.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

# त्रिभाषा धोरण निश्चित करण्यासंदर्भातील समितीस ४ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 च्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्यासंदर्भात शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली दि. 30 जून, 2025 रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला, या समितीच्या कार्यकाळास दि. 5 जानेवारी पासून दि. 4 फेब्रुवारी, 2026 या कालावधीसाठी (एक महिना) मुदतवाढ देण्यात आली आहे. शालेय शिक्षण विभागामार्फत याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. या समितीस दि. 15 डिसेंबर 2025 च्या शासन निर्णयान्वये दि. 5 डिसेंबर, 2025 ते 4 जानेवारी, 2026 या कालावधीकरिता एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि, समितीचे कामकाजाप्रित्यर्थ समितीच्या संकेतस्थळावर विविध जनसामान्यांमार्फत प्राप्त प्रश्नावली व मतावलीद्वारे प्राप्त प्रतिसाद यावर विचारविमर्श व पुढील विश्लेषण करण्याच्या कार्यवाहीसाठी आता 4 फेब्रुवारी 2026 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

## सुडोकु - 159

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 7 | | | 4 | 2 | 9 | 1 | 5 |
| 1 | 3 | | 5 | | 8 | | 2 | |
| 5 | | 2 | | | | | 8 | 3 |
| 4 | | 3 | | | | 8 | 7 | |
| | 6 | 7 | | | 1 | 3 | | |
| | | | | | | 2 | 5 | |
| | | 4 | 6 | | 5 | | 3 | |
| 6 | | 1 | | | 4 | 5 | | 8 |
| | 8 | | 2 | | | | | 4 |

# मोहोळ तालुक्यामध्ये जिल्हा परिषदेचा १ तर पंचायत समितीचे ४ अर्ज अवैध

कुरुल (कटूसत्य वृत्त):- होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या काल उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी जिल्हा परिषद ९० तर पंचायत समिती १०१ नामनिर्देशन पत्र दाखल झाले होते. आज मोहोळ तहसील कार्यालय येथे निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन मुळे यांच्या प्रशासन प्रमुख उपस्थितीत अर्ज छाननी प्रक्रिया पार पडली. यामध्ये जिल्हा परिषद ८९ तर पंचायत समिती ९७ इतके अर्ज वैध ठरले तर जिल्हा परिषदेचा एक व पंचायत समितीचे चार अवैध झाले.



अंतिमरित्या स्विकारण्यात आलेल्या नामनिर्देशनपत्रांची संख्या जिल्हा परिषद ८९, तर पंचायत समिती ९७ इतकी राहिली आहे. यामध्ये जिल्हा परषिद गट नरखेड सुशिलकुमार कुबेर मोटे यांनी शपथ साक्षांकित न केल्याने अवैद्य ठरविण्यात आला आहे.पंचायत समिती गण सावळेश्वर मयुरी समाधान शेंडगे यांनी सूचक दुबार,कामती (बु.) गण अंजली जीवन गंगाणे अनामत रक्कम भरली नाही.पोखरापूर गण फुलचंद निवृत्ती सरवदे सूचक इतर गटातील, तर टाकळी सिकंदर गण स्वाती दिपक गवळी सूचक दुबारा झाल्याने अवैद्य ठरविण्यात आला आहे.जिल्हा परिषद १,पंचायत समिती ४ अशा पाच नामनिर्देशन पत्र अवैद्य ठरविण्यात आले आहेत.

# आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेने १ हजार कोटींचा एकत्रित व्यवसायाचा टप्पा केला पार..!

## रायगड जिल्ह्यातील पहिली पतसंस्था ठरण्याचा मान; सभासदांच्या विश्वासातून ऐतिहासिक यश

**अलिबाग (कटूसत्य वृत्त) :** आदर्श नागरी सहकारी पतसंस्था, अलिबाग या संस्थेने १ हजार कोटी रुपयांच्या एकत्रित व्यवसायाचा ऐतिहासिक टप्पा यशस्वीरीत्या ओलांडला असून रायगड जिल्ह्यातील ही पहिलीच पतसंस्था ठरली आहे, जी या भरीव कामगिरीपर्यंत पोहोचली आहे. ही माहिती संस्थेचे संस्थापक सुरेश पाटील आणि अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी बुधवार (दि. २१) रोजी अलिबाग येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.




१९९८ साली स्थापन झालेल्या आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेने अवघ्या २७ वर्षांत रायगड जिल्ह्यासह राज्यभरात विश्वासार्ह आणि सक्षम आर्थिक संस्था म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. आज संस्थेचा एकूण एकत्रित व्यवसाय १००३ कोटी रुपयांवर पोहोचला असून त्यामध्ये ५५८ कोटी रुपयांच्या ठेवी आणि ४४५ कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे.

२०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या अखेरीस संस्थेचा एकत्रित व्यवसाय ७५२ कोटी ७७ लाख रुपये इतका होता. मार्च २०२६ पर्यंत १ हजार कोटी रुपयांचा टप्पा गाठण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. मात्र सभासदांनी संस्थेवर दाखवलेल्या अतूट विश्वासामुळे अवघ्या दहा महिन्यांत २५० कोटी रुपयांची वाढ होऊन हा टप्पा अपेक्षेपेक्षा आधीच गाठण्यात आला, असे सुरेश पाटील यांनी सांगितले.

विशेष बाब म्हणजे, १००३ कोटी रुपयांहून अधिक व्यवसाय असूनही आदर्श पतसंस्थेचा ग्रॉस एनपीए (थकबाकी) १ टक्क्यापेक्षा कमी आहे. त्यामुळे आदर्श ही राज्यातील अग्रगण्य आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम (एफएसडब्ल्यूएम) पतसंस्थांपैकी एक मानली जात आहे.

आदर्श पतसंस्थेचे कार्यक्षेत्र राज्यस्तरीय असून रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, पुणे आणि मुंबई या जिल्ह्यांमध्ये संस्थेच्या एकूण २२ शाखा कार्यरत आहेत. यामध्ये एक स्वतंत्र गोल्ड कर्ज शाखा तसेच पुण्यातील दोन शाखांचा समावेश आहे. पुण्यातील एका पतसंस्थेचे यशस्वी विलीनीकरणही करण्यात आले असून सर्व शाखा नफ्यात असल्याचे संस्थेने स्पष्ट केले.

कर्जवसुलीबाबत कोणतीही तडजोड न करता काटेकोर धोरण राबवण्यात आले. प्रत्येक कर्मचारी आणि अधिकारी यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी स्वतःला झोकून देऊन काम केल्यामुळे हे यश शक्य झाले, असे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी सांगितले. ३१ मार्च २०२६ पर्यंतही ग्रॉस एनपीए १ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्याचा संस्थेचा निर्धार असल्याचे त्यांनी नमूद केले.

सध्या सहकारी पतसंस्थांविषयी अविश्वासाचे वातावरण असतानाही आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेवर मात्र सभासद व ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ होत आहे. प्रामाणिक सेवा, वेळेवर कर्जवसुली, ठेवीदारांचे हित जपणे आणि पारदर्शक कारभार यामुळे संस्थेच्या व्यवसायात झपाट्याने वाढ होत आहे. भविष्यात राज्यातील पहिल्या पाच अग्रगण्य पतसंस्थांमध्ये आदर्शला स्थान मिळवून देण्याचे उद्दिष्ट असल्याचेही संस्थापक सुरेश पाटील यांनी स्पष्ट केले.

आदर्श पतसंस्थेच्या या यशामुळे रायगड जिल्ह्यातील सहकार चळवळीला नवी दिशा मिळाली असून, सहकारातून आर्थिक सशक्तीकरण शक्य आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

# अहिल्यापुलावरील संरक्षक कठडे तात्काळ दुरुस्त करावेत - प्रांताधिकारी सचिन इथापे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** माघ शुद्ध एकादशी 29 जानेवारी 2026 रोजी होणार आहे. यात्रा कालावधी 23 जानेवारी ते 01 फेब्रुवारी असून, श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपुरात तीन ते चार लाख भाविक येतात. या यात्रा कालावधीत अहिल्या पुलावरुन वारकरी भाविकांच्या व इतर वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतुक होत असते. अहिल्या पुलावरील संरक्षक कठडे नादुरुस्त असून, या ठिकाणी कोणतीही अनुचित घडना घडू नये यासाठी तात्काळ मजबूत संरक्षक कठडे करावेत तसेच प्रखर प्रकाश व्यवस्था करावी अशा सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.




माघवारी पूर्व नियोजनाबाबत प्रांत कार्यालय पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उप कार्यकारी अभियंता भीमाशंकर मेटकरी, मुख्याधिकारी महेश रोकडे, पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे, मंदिर समितीचे लेखाधिकारी मुकेश आनेचा, यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते .

यावेळी प्रांताधिकारी इथापे म्हणाले, यात्रा कालावधीत चंद्रभागा नदीपात्रात वारकरी भाविकांना पवित्र स्नान करता यावे यासाठी पाटबंधारे विभागाने पाणी सोडण्याचे नियोजन करावे. या कालावधीत नगरपालिकेने स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा मुबलक पाणी पुरवठा करावा, वाळवंटाचीस्वच्छता व पुरेशा प्रकाश राहिल याबाबत नियोजन करावे तसेच अतिक्रमणे काढावीत, बोअरवेल व हातपंप पाण्याची तपासणी करावी. मंदीर समितीने व नगरपालिकेने प्रदक्षिणा मार्ग, नदीपात्रात आवश्यक ठिकाणी बॅरेकेटींग करावे व अग्निशामक यंत्रणा कार्यरत ठेवावी. नदी पात्रात वाहने येऊ नयेत यासाठी बॅरेकेटींग करावे. सुलभ शौचालयाचा ठिकाणी मुबलक पाणी व्यवस्था करावी. वाहनतळाची जादा व्यवस्था करावी. तसेच मोफत वाहनतळ व्यवस्थेबाबत ठळक फलक लावावेत. अन्न औषध प्रशासन विभागाने मठात शिजविण्यात येणाऱ्या अन्नाची तसेच शहरातील हॉटेलची वेळोवेळी तपासणी करावी. शहरात वाहतुकीची कोंडी होऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने नियोजन करावे. अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

मंदीर समितीने यात्रा कालावधीत भाविकांना दर्शन रांग, दर्शन मंडप येथे आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत असून, दर्शनरांगेत मॅट, बसण्याची सुविधा, पिण्याचे पाणी, शौचालये, विश्रांती कक्ष, बाथरूम, लाईव्ह दर्शन आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. दर्शनरांगेत भाविकांना मोफत चहा व खिचडी वाटप करण्यात येणार आहे. चेंजिंग रूम, हिरकणी कक्ष, दर्शनमंडप येथे महिला भाविकांच्या सोईसाठी सॅनिटरी नॅपकीन, चंद्रभागा वाळवंट येथे चेंजिंग रूम उभारण्यात येत आहे. तसेच भाविकांच्या सुलभ व जलद दर्शनाला प्राधान्य दिले असून, यासाठी योग्य नियोजन करण्यात आले असल्याची माहिती मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी यावेळी दिली.

# प्लॅस्टिक राष्ट्रध्वज वापरास बंदी;

## ध्वजसंहितेचे पालन करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाने दिलेल्या निदेर्शानुसार राष्ट्रध्वजासाठी प्लॅस्टिकच्या वापरास, तसेच प्लॅस्टिक राष्ट्रध्वज निर्मिती व वापरास मान्यता नसल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद (भा.प्र.से.) यांनी स्पष्ट केले आहे.



राष्ट्रध्वज रस्त्यावर किंवा इतर ठिकाणी फेकून देऊ नयेत. खराब झालेले राष्ट्रध्वज आढळून आल्यास ध्वजसंहितेतील तरतुदीनुसार त्यांचा सन्मानपूर्वक नाश करणे आवश्यक आहे. राष्ट्रध्वजाचा अवमान किंवा विटंबना करणे हे बोधचिन्ह व नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम 1950, राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम 1971 तसेच ध्वजसंहितेनुसार दंडनीय गुन्हा असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. तसेच, कोणतेही खराब राष्ट्रध्वज आढळून आल्यास ते सन्मानपूर्वक गोळा करून नजीकच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयात जमा करण्याचे आवाहन त्यांनी जनतेस केले आहे.

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हावासियांना हार्दिक शुभेच्छा देत ध्वजसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे.

# अकलूज येथील डी फार्मसी कॉलेज मध्ये रक्तदान शिबिर संपन्न

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथील डी फार्मसी कॉलेज मध्ये रक्तदान शिबिर संपन्न झाले. शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कॉलेज ऑफ फार्मसी (पदविका) ने सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या 108 व्या जयंती निमित्त रक्तदान शिबिर आयोजित केले होते.

रक्तदान हे सर्व श्रेष्ठ दान हि संकल्पना जाणून सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील ब्लड सेंटर आणि कॉलेज ऑफ फार्मसी (पदविका), अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर संपन्न झाले. सदर रक्तदान शिबिरामध्ये एकूण 51 जणांनी रक्तदान केले.

सदर शिबिरास महाविद्यालयाचे प्राचार्य नानासाहेब देवडकर, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी तसेच ब्लड बँकचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अजित गांधी आणि त्यांचे सहकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.




# वाचनाने जाणिवा समृद्ध होतात - नितीन वैद्य

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वाचन ही केवळ मनोरंजनाची बाब नसून सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. व्यापक आणि सातत्यपूर्ण वाचनामुळे माणसाच्या जाणिवा समृद्ध होतात, विचारांची खोली वाढते आणि समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक प्रगल्भ होतो, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक नितीन वैद्य यांनी केले.



सिद्धेश्वर पेठ येथील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ग्रंथमित्र कुंडलिक मोरे यांनी भूषविले.

यावेळी व्यासपीठावर जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे, तालुका ग्रंथपाल धोंडीराम जेऊरकर, श्रीमती वृषाली हजारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

नितीन वैद्य पुढे म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या जीवनात वाचनाची सवय कमी होत चालली आहे. मात्र पुस्तकांशी मैत्री केल्यास माणूस अधिक संवेदनशील, विचारशील आणि जबाबदार नागरिक बनतो. विशेषतः मातृभाषेतील साहित्य वाचन केल्यास सांस्कृतिक जाणीव अधिक दृढ होते आणि भाषेचे जतन व संवर्धन घडून येते.

प्रास्ताविकात जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे यांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याची माहिती देत, जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक ग्रंथालयांनी या कालावधीत विविध उपक्रम, वाचन चळवळी, साहित्यिक कार्यक्रम व ग्रंथ प्रदर्शनांचे आयोजन करून वाचन संस्कृती रुजवावी, असे आवाहन केले.

अध्यक्षीय मनोगतात ग्रंथमित्र कुंडलिक मोरे यांनी मराठी भाषा समृद्ध करण्यात ग्रंथालयांची भूमिका अत्यंत मोलाची असल्याचे सांगितले. 'ग्रंथालये ही केवळ पुस्तके ठेवण्याची जागा नसून, ती ज्ञान, विचार आणि संस्कृतीची केंद्रे आहेत. मराठी भाषा संवर्धनासाठी प्रत्येक वाचकाने आणि नागरिकाने उत्स्फूर्तपणे पुढाकार घेणे गरजेचे आहे,' असे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन संजय ढेरे यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन प्रदीप गाडे यांनी केले होते. या कार्यक्रमास विविध वयोगटातील वाचक, विद्यार्थी, ग्रंथप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या ग्रंथ प्रदर्शनामुळे वाचन चळवळीला नवी ऊर्जा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# महापालिका निवडणूक खर्चाचा घोळ

## १०२ विजयी नगरसेवक अडचणीत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत निवडून आलेल्या १०२ नगरसेवकांनी प्रचाराच्या शेवटच्या दिवसाचा निवडणूक खर्च अद्याप सादर केलेला नाही. या सर्व नगरसेवकांना पत्र पाठवून खर्च सादर करण्याबाबत मागणी करण्यात येणार असल्याची माहिती मुख्य लेखापाल रत्न राज जवळगेकर यांनी बुधवारी दिली. महापालिका निवडणुकीत एकूण ५६४ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. निवडणूक संपल्यानंतर ३० दिवसांच्या आत खर्च सादर करणे बंधनकारक असून, तसे न केल्यास संबंधित उमेदवार तीन वर्षांसाठी निवडणूक लढविण्यास अपात्र ठरू शकतो, असा नियम आहे.



दरम्यान, निवडणुकीत पराभूत झालेल्या २० उमेदवारांनी अद्याप निवडणूक खर्च सादर करण्याबाबत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या उमेदवारांना नोटिसा बजावण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. बहुतांश उमेदवारांनी १० जानेवारीपर्यंतचा खर्च सादर केला आहे. मात्र, प्रचाराचा शेवटचा दिवस मंगळवार, १३ जानेवारी रोजी काढण्यात आलेल्या पदयात्रा, सभा व इतर कार्यक्रमांचा खर्च अद्याप सादर झालेला नाही. निवडून आलेल्या उमेदवारांनी १२ जानेवारीपर्यंतचा खर्च दिला असला, तरी शेवटच्या दिवसाचा खर्च प्रलंबित असल्याचे मुख्य लेखापाल कार्यालयाकडून सांगण्यात आले.

निवडणूक खर्च सादर न करण्याबाबत काही उमेदवारांकडून आजारपण, पराभवामुळे मानसिक तणाव, वकिलांशी संपर्क साधत असल्याची कारणे दिली जात आहेत. मात्र, १५ दिवसांनंतर अशी कारणे ग्राह्य धरली जाणार नाहीत, त्यानंतर कारवाईचे प्रस्ताव तयार करण्यात येतील, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

निवडणुकीत उमेदवारासाठी नऊ लाख रुपयांची खर्च मर्यादा निश्चित करण्यात आली होती. १५ दिवसांनंतर प्रशासन स्वतः खर्च मागविण्याची प्रक्रिया सुरू करते, तर ३० दिवसांनंतरही खर्च सादर न झाल्यास विभागीय कार्यालयांकडे कारवाईचा प्रस्ताव पाठविला जातो, असेही प्रशासनाकडून सांगण्यात आले.

